# सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, लातूर यांचेकडून राबविण्यात येत असलेल्या फ्लॅगशिप योजनांची माहिती

**१. भारत सरकार शिष्यवृत्ती योजना :-**

अनुसूचित जाती प्रवर्गातील इयत्ता १० वी नंतर विविध अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती प्रदान केली जाते. सन २०२४-२५ मध्ये अनुसूचित जातीच्या एकूण- **६७०७** विदयार्थ्यांना रु. **१७.०३** कोटी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आलेली आहे. महाडीबीटी प्रणालीवर सन २०२४-२५ मध्ये अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त करुन घेऊन मंजूर करण्याची कार्यवाही जलद गतीने सुरु आहे.

**२. शासकीय वसतिगृह योजना :-**

महाराष्ट्रामध्ये सर्वात जास्त लातूर जिल्हयामध्ये १३ मुलांचे व १२ मुलींचे असे एकूण २५ शासकीय वसतिगृहे कार्यान्वित असून विद्यार्थी प्रवेश क्षमता **२७९०** इतकी आहे. सदर वसतिगृहामध्ये प्रवेश घेणाऱ्या विदयार्थ्यांना मोफत निवास, भोजन दिले जाते तसेच शैक्षणीक साहित्य व निर्वाह भत्ता प्रदान करण्यांत येतो.

**३. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना :-**

महानगरपालिका क्षेत्रातील महाविदयालयात शिकत असलेल्या अनुसूचित जातीच्या विदयार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही अशा विदयार्थ्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ दिला जातो. सन २०२३-२४ मध्ये एकूण **१८८८** विदयार्थ्यांना **रु. १७.८४** कोटी इतक्या रकमेचा लाभ देण्यात आलेला आहे. सन २०२४-२५ या आर्थीक वर्षात लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.

**४. अनुसूचित जातीच्या मुला/मुलींकरिता शासकीय निवासी शाळा :-**

लातूर जिल्हयामध्ये अनुसूचित जातीच्या मुला मुलींकरिता शासकीय निवासी शाळा सुरु करण्यांत आलेल्या असून त्यापैकी ०४ मुलांच्या व ०२ मुलींच्या अशा एकूण ०६ शाळा कार्यान्वित आहेत. सदर शासकीय निवासी शाळेमध्ये इयत्ता ६ वी ते १० वी पर्यतच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत येतो. प्रवेशित विदयार्थ्यांना मोफत निवास, भोजन इत्यादीची व्यवस्था करण्यात येते.

**५. रमाई घरकुल आवास योजना:-**

लातूर जिल्हयामध्ये नागरी व ग्रामीण क्षेत्रामध्ये सन २०१८-१९ ते २०२४-२५ या कालावधीमध्ये एकूण **३००२३** घरकुलांना मंजूरी देण्यात आलेली आहे.

६. **जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती उपयोजना :-**

जिल्हा वार्षिक अनुसूचति जाती अंतर्गत लातूर जिल्हयामध्ये वेगवेगळया १६ शासकीय कार्यालयामार्फत **४५** योजना राबविल्या जातात. सन २०२३-२४ मध्ये **रु. १२४ कोटी** इतका निधी खर्च झालेला आहे. सन २०२४-२५ मध्ये **रु.१२५ कोटी** इतका निधी मंजूर झाला आहे. त्यापैकी **रु.४४ कोटी** निधी प्राप्त असून **रु.३९ कोटी** निधी खर्च झाला आहे. उर्ववरीत निधी खर्च करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर योजनेअंतर्गत कार्यान्वयीन यंत्रणेकडून लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे.

सदर योजनेच्या नाविण्यपुर्ण योजनेअंतर्गत शासकीय निवासी शाळांकरीता स्मार्ट नोटीस बोर्ड खरेदी करण्यात आलेले आहेत. सामाजिक न्याय विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या प्रचार व प्रसिध्दीकरीता डिजिटल स्टॅन्डी खरेदी करण्यात आलेल्या आहेत. लातूर जिल्हयातील शासकीय वसतिगृह व निवासी शाळेमध्ये सांडपाणी प्रकल्प आणि त्याचा पुर्नवापर योजना राबविण्यात आलेली आहे व समाज कल्याण कार्यालयाचे बळकटीकरणांतर्गत रेकॉर्ड ठेवण्यासाठी कॉम्पॅक्टर खरेदी करण्यात आलेले आहेत.

**७. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना**

लातूर जिल्हयातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकाच्या नागरी व ग्रामीण भागातील वस्ती/ गावांचा विकास करण्याबाबत लोक प्रतिनिधीनी सुचविलेल्या कामांना सन २०२४-२५ मध्ये **२०४** कामांसाठी **रु.१५ कोटी** निधी महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेला आहे.

**८. तृतियपंथी कल्याण योजना :-**

**लातूर** जिल्ह्यात एकुण १९ तृतीयपंथी वास्तव्यास असून, त्यांना आधारकार्ड, रेशनकार्ड व मतदान कार्ड इत्यादीचे वाटप करण्यात आलेले आहे. तसेच केंद्र शासनाच्या ध्येय धोरणाप्रमाणे त्यांना ओळखपत्र वाटप करण्यात आलेली आहेत. त्यांचेकरीता विविध आरोग्य शिबिर इत्यादी शिबीराचे आयोजन करण्यात येते.

९. ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याण :-

ज्येष्ठ नागरिकांचे वृध्दापकाळातील आयुष्य सुखकर, आनंददायी, आरोग्य वर्धक व तणावमुक्त होण्याकरीता ज्येष्ठ नागरिकांसाठी असणा-या शासनाच्या विविध योजना राबविल्या जातात. लातूर जिल्हयामध्ये ज्येष्ठ नागरिकांना तात्काळ सर्व सुविधा मिळणेसाठी व ज्येष्ठ नागरिकांचे सर्व्हेक्षण करुन अडी-अडचणी सोडविणेसाठी लातूर जिल्ह्यामध्ये portal.aadharwad.com हे संकेतस्थळ विकसीत करण्यात आलेले आहे. या संकेतस्थळावर आज अखेर **२०६११९** इतक्या जेष्ठांची नोंदणी झालेली असून उर्वरीत नोंदणी करुन घेण्याचे काम सुरु आहे.

१०. ऊसतोड कामगारांना ओळखपत्र वाटप करणे :-

लातूर जिल्हयामध्ये ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षणाचे काम सुरु असून, तालूकास्तरावर **३५९९** ऊसतोड कामगारांची नोंदणी झालेली असून **३३२७** कामगारांना ओळखपत्र वाटप करण्यात आलेले आहे.

११. ऊसतोड कामगारांना मुलांकरीता शासकीय वसतीगृह :-

लातूर जिल्ह्यात ऊसतोड कामगारांच्या मुलां/मुलींकरीता संत भगवानबाबा मुलां/मुलींचे शासकीय वसतीगृह रेणापूर, जळकोट येथे सुरु करण्यात आलेले आहेत. सदर वसतीगृहाकडून विद्यार्थ्यांकरीता निवास, भोजन व इतर सोयीसुविधा पुरविण्यात येतात.

१२. मुख्यमंत्री वयोश्री योजना:-

राज्यातील ६५ वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानपरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधणे/उपकरणे खरेदी करणेकरिता तसेच मन:स्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र इ. द्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी राज्यात "मुख्यमंत्री वयोश्री योजना" सुरु करण्यात आलेली आहे. सदर योजनेअंतर्गत प्रस्तूत कार्यालयास **३७६६५** अर्ज प्राप्त झालेले असून **१२९०४** नागरीकांना निधी वितरीत करण्यात आलेला आहे. उर्ववरीत **२४७६१** अर्जांची छाननी करुन लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.

**१३. मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना:-**

महाराष्ट्र राज्यातील सर्व धर्मियांमधील ६० वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना तीर्थ यात्रेची मोफत संधी देण्यासाठी “मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना” सुरु करण्यात आलेली आहे. सदर योजनेअंतर्गत राज्यामधील ज्येष्ठ नागरिकांना तीर्थक्षेत्र यात्रा मोफत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर योजनअंतर्गत आयोध्या या ठिकाणी ८०० नागरीकांना मुख्यमंत्री तिर्थ दर्शन योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.